
Samachar Patrika RNI 16775/1967 Regd. No. MCW-126/2024-26, Published on 15th of every month



# देशस्थ ऋग्वेदी ब्राह्मण समाचार



वर्ष ५८ वे, अंक ७वा, मुंबई । सप्टेंबर २०२५
एकूण पाने २० । प्रती अंक ₹ ५ । वार्षिक वर्गणी ₹ ५०

Year : 58, Issue : 7, Mumbai I September 2025
Total Pages 20 I Price per Issue ₹ 5 I Yearly Subscription ₹ 50



## नवरात्र आणि दसऱ्याच्या

## हार्दिक शुभेच्छा....


## विद्यार्थी गुणगौरव सोहळा, मुंबई









देशस्थ ऋग्वेदी ब्राह्मण

**समाचार**

वर्ष ५८वे, अंक ७वा,
सप्टेंबर २०२५
(फक्त सभासदांसाठी)

**श्री. महेंद्र गंधे**
अध्यक्ष

**श्री. प्रभाकर कुलकर्णी**
कार्याध्यक्ष

**श्री. विनोद मांडके**
कोषाध्यक्ष

**श्री. मिलिंद सरदेशमुख**
कार्यवाह

**संपादक**
**श्री. मिलिंद सरदेशमुख**
मो. : ९८६७९९४३८९

**अंकातील मजकूराशी मंडळ सहमत असेलच असे नाही**

दूरध्वनी : २४३०२२७३, २४३०७५७३
ई–मेल : aadrbm@gmail.com
संकेतस्थळ : www.adrbmmahim.in



MF
क्षेत्रज्ञं चापि मां विद्धि सर्वक्षेत्रेषु भारत।
MELGIRI FARMS
Relaxing Huts
Tamarind Umbrella
Toy Train
Pottery
Kids Play Area
Bullocart
Farm Visit 365 Days Bhutta Party Sept & Oct
Hurda Party Dec-feb Farm Tourisim 365 Days
Kitty Parties 365 Days Birthdays 365 Days
Get Togethers 365 Days Dairy Farm Visit 365 365 Days
Glamping 365 365 Days
Pre & Post Wedding Shoots
Agro Tourism For Schools & Corporates
Direct from FARM FRESH Vegetables & fruits at Your Doorstep on SAME DAY
For BOOKINGS Call:
70137 78442 | 97039 77724
Farm: S.No. 66, 67, 75 & 76A, Yenkepalli, Bakaram Road, Moindabad Mandal, R.R. Dist, Telangana - 500075
R.O. For Correspondence: 3-4-22, Venkatesh Bhuvan, Dr. Bhoomanna Lane, Kachiguda, Hyderabad 500027
/Melgiri Farms
Just 30 mins Drive from Gachibowli & Hitech City




**महाराष्ट्र शासनातर्फे देशस्थ ऋग्वेदी ब्राह्मण बडोदा संस्थेचा गौरव**





**कोथरूड पुणे येथील देशस्थ ऋग्वेदी ब्राह्मण संघाच्या कार्यालयाचे उदघाट्न**
**मा. मंत्री चंद्रकांत पाटील यांचे शुभ हस्ते**

# पुढील पिढीच्या निरोगी भारतासाठी वस्तू व सेवा करामध्ये लोकाभिमुख निर्णय

आपले लोकप्रिय प्रंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी मागच्या लोकसभेच्या अधिवेशन दरम्यान भावी पिढीसाठी सुयह्य कररचना करण्याचे आश्वासन दिले होते. त्यांच्या आदेशानुसार भारताच्या अर्थमंत्री सौ. निर्मला सितारामण यांनी प्राप्ती करामध्ये सुस्पष्टता आणून अनेक करदात्यांना प्राप्तीकरांमध्ये अर्थसंकल्पाच्या वेळी सूट देण्याचा निर्णय घेतला आहे व त्यानंतर आता दि. ६ सप्टेंबर २०२५ रोजी अर्थमंत्री यांनी वस्तू व सेवा करामध्ये मोठी सूट देऊन ही कर प्रणाली ४ वेगवेगळ्या दरामधून २ दरावर आणली आहे. वस्तू व सेवाकरांची अमंलबजावणी १ जुलै २०२७ रोजी झाली. २०१७ च्या आधी भारतामध्ये ग्राहकांना त्यांनी घेतलेल्या वस्तूवर वेगवगळया राज्यात वेगवेगळ्या दराने विक्रीकर भरावा लागत असे त्यामुळे प्रत्येक राज्यामध्ये जीवनपयोगी वस्तूचे दर ही वेगवेगळे होते. व नागरीक जेव्हा एका राज्यातून दुसऱ्या राज्यात जात असे तेव्हा त्यांच्या खिशाला कमी अधिक भूरदंड बसत असे. याच्या व्यतिरिक्त एका राज्यातून एका राज्यात उत्पादन केलेल्या किंवा बनवलेल्या मालावर तो जर भारताच्या दुसऱ्या राज्यातील ग्राहकाने घेतला असेल तर त्याला जास्त विक्रीकर भरावा लागत असे कोणत्याही प्रकारचे विक्रीकर भारतामध्ये दर निश्चिती नसल्याने ग्राहकांना याशिवाय महत्त्वाचे म्हणजे महाराष्ट्रात उत्पादित झालेला माल जर गुजरातला पाठवायचा असेल तर त्याना गुजरातच्या सीमेवर विक्रीकर भरावा लागत असे आणि त्याला महाराष्ट्रात ही कर भरावा लागत असे. या करा व्यतिरीक्त अनेक राज्यांमध्ये विविध शहरांमध्ये स्थानिक स्वराज्य संस्थाकडून ऑक्ट्रॉय (जकात कर) नावाचा कर ही वसूल करण्यात येत असे. मुख्यत: तसेच ग्राहकांना देण्यात येणाऱ्या विविध सेवेवर कुठलाही कर १ जुलै २०१७ च्या आधी लागू नव्हता या सर्व कर क्लिष्टतेमुळे भ्रष्टाचार फोफावला होता व ग्राहकाला, विक्रेत्याला तसेच पुरवठा दाराला यांचा भार सहन करावा लागल्यामुळे वस्तूच्या किंमती उंचावल्या होत्या. तसेच राज्य सरकार व केंद्र सरकार यांच्यामध्ये कर वसूली संबंधात जी प्रणाली लागू होती त्यामध्ये सुस्पष्टता नव्हती.

वरील सर्व प्रश्नांची उत्तर म्हणून करप्रणालीमध्ये सुसूत्रामध्ये केंद्र व राज्य प्रणाली यांच्यामध्ये कर वसूलीत योग्य भागीदारामध्ये याचा समान्वय राहण्यासाठी १ जुलै २०१७ पासून वस्तू व सेवाकर आमलात आणला. गेली ८ वर्षे हा वस्तू व सेवा कर पूर्णपणे स्थिर झाले असून त्यांचे फायदे व तोटे यांचा अभ्यास करून सरकारने ४ विभागात असलेली वस्तू व सेवा कर २ करावर आणली आहे. इथे अजून नमूद करावे वाटते की, वस्तू व सेवा कर सरकारला रु. १ लाख कोटींच्यावर मिळत असेल तो आता २०२५ साली त्यांची योग्य अंमलबजावणी झाल्याने रु. २ लाख कोटींच्यावर गेला आहे याची सर्व अंमलबजावणी संगणकाव्दारे असल्याने त्याची वसूली योग्य प्रकारे घेत आहे आणि सुसूत्रीकरण झाले आहे त्याचा फायदा देशाच्या अर्थव्यवस्थेला बळकट करण्यात झाला आहे.

एकदंरीत वस्तू व सेवा कराच्या अंमलबजावणीच्या सुखद अनुभवातून बोध करून २२ सप्टेंबर २०२५ पासून जीवनरक्षक औषधे मुख्यत: कर्करोग आणि दुर्मिळ आजारावरील कर १२ टक्क्यावरून शून्य टक्क्यावर आणला आहे तसेच वैद्यकीय उपकरणावरील कर १८ टक्क्यावरून ५ टक्क्यावर आणला आहे आणि इतर वैद्यकीय उपकरणावरील ग्लुकोमीटर, बैंडेज, वैद्यकीय तपासणी, ऑक्सिजन यावरील कर १२ टक्क्यावरून ५ टक्क्यावर आणला आहे. या व्यतिरीक्त वैयक्तिक आरोग्य आणि जीवन विमा यावरील कर १८ टक्क्यावरून शून्य टक्क्यावर आणला आहे या सर्वाचा सुखद परीपाक हा आहे की, यापुढे आरोग्य सेवा सरकारने लोकांना माफक दरात उपलब्ध करून सर्व सामान्य आणि ज्येष्ठ नागरीकांचे आरोग्य निरोगी ठेवून त्याचे व इतरांचे आयुष्यमान वाढावे यासाठी प्रयत्न केले आहे.

भारतसरकारने काही महागड्या वस्तू ही त्या आता जीवनावश्यक बनल्या आहेत वा उपकरणे टेलिव्हिजन, वॉशिंगमशीन, डिशवॉशर, फ्रिज यांच्या वरील कर ही १८ टक्क्यावरून ५ ते १२ टक्क्यावर आणला आहे जेणेकरून सर्व सामान्यांना विकत घेऊन त्याचे आयुष्य ही सुसह्य करण्याचा सरकारने प्रयत्न केला आहे. या व्यतिरीक्त २ चाकी, ३ चाकी, ४ चाकी वर ही वस्तू आणि सेवा कर कमी केल्याने सर्व सामान्य मनुष्यसुध्दा या सर्व विकत घेऊ शकतील आणि त्यांचे राहणीमान उंचावू शकेल. या सर्वाचा फायदा म्हणजे लोकांची क्रियाशक्ती वाढल्याने बाजार पेठेत तेजी येऊन भारताची अर्थव्यवस्था तिसऱ्या नंबरवर जाण्यास मदत होणार आहे. अशा या ग्राहकप्रेमी निर्णयामुळे एकदंरीत सर्वसामान्य भारतीयांचे राहणीमान उंचावून सणासुदीचा काळ म्हणजे दिवाळी त्यांची अधिक आनंदी आणि गोड होईल अशी अपेक्षा आहे. या ऐतिहासिक निर्णयाबद्दल भारत सरकारचे हार्दिक आभिनंदन!

**– प्रभाकर कुलकर्णी**
कार्याध्यक्ष

# दैनंदिन जीवनात दासबोध समर्थांना अभिप्रेत वैराग्ययोग

**स.भ. मोहनबुवा रामदासी (मो. : ९१४६८५५६९१)**

म्हणौन विवेक आणि वैराग्य । तेंचि जाणिजे महद्भाग्य । रामदास म्हणे योग्य । साधु जाणती ।। २० ।। श्रीमत दासबोध दशक १२, समास ४ मागील लेखामधे आपण विवेकयोगाबद्दल माहिती घेतली. या योगात समर्थांना अभिप्रेत असा वैराग्ययोगाबद्दल आपण विवेचन करणार आहोत. वरील ओळीत समर्थ हे अधोरेखित करतात की विवेक आणि वैराग्य ज्याच्याकडे आहे तो खूप भाग्यवान आहे. ही गोष्ट फक्त साधुजनांना समजते. कारण अंतर्बाह्य मोक्ष प्राप्तीचा हा राजमार्ग आहे. विवेक आणि वैराग्य एकत्रितपणे महत्वाचे आहे. विवेक नसेल आणि वैराग्य असेल तर त्याचा काहीही फायदा होत नाही, याउलट विवेक असूनही वैराग्य धारण करता येत नसेल तर ते ही उचित ठरत नाही.

विवेकेंविण वैराग्ये केलें । तरी अविवेकें अनर्थीं घातलें । अवघें वेर्थचि गेलें । दोहिंकडे ।। ६ ।। आणि वैराग्येंविण ज्ञान । तो वेर्थचि साभिमान । लोभदंभें घोळसून । कासाविस केला ।। ९ ।। वरील ओव्यांमध्ये समर्थांना विवेक रहित वैराग्य व वैराग्य रहित विवेक याबाबत समर्थांनी आपणांस सूचित केले आहे. दोन्हींचीही उपयुक्तता नाही. विवेकाविना वैराग्याने सर्वच व्यर्थ जाते तर वैराग्याविना विवेकाने फक्त अंगी अभिमान बाणतो. त्यामुळेच योग्य साधकाने विवेकाने वैराग्य धारण केले पाहिजे. दैनंदिन जीवनात आपण हे वैराग्य आचरणात आणू शकतो. विवेकें अंतरीं सुटला । वैराग्यें प्रपंच तुटला । अंतर्बाह्य मोकळा जाला । निःसंग योगी ।। १२ ।। विवेकाच्या मदतीने आपण आपले स्वत्व जाणू शकतो. नीरक्षीरविवेक हा आपल्यात असेल तर आपण आपले अस्तित्व कशासाठी आहे? मी कोण आहे? हे प्रश्न सोडवू शकतो. या प्रश्नांची उकल झाली तर आपला अंतःकरणातील गुंता सुटून जाईल. तसेच आपण वैराग्य धारण केले तर बाहेरील बंध मोकळे होतील. अशाप्रकारे आपण संपूर्णत: मुक्त होऊ व योगी ज्या स्थितप्रज्ञ अवस्थेत जातात त्या अवस्थेत आपण पोहोचू.

दैनंदिन जीवनात आपण अशा गोष्टी शोधू शकतो ज्याबाबत आपण आसक्त आहोत त्यापासून विवेकाने अलिप्तता बाळगत. विवेकाने वैराग्य आपण धारण केलं पाहिजे. जेव्हा मनाला कळते की बाह्य गोष्टींमध्ये खरे सुख नाही, तेव्हा त्याच्याबद्दलची आसक्ती आपोआप कमी होते. ही अवस्था म्हणजे वैराग्य. हे जग सोडून

पळून जाणे नाही, तर जगात राहूनही त्याला न बांधले जाणे – हे खरे वैराग्य.विवेक जागृत झाला की वैराग्य निर्माण होते. उदाहरणार्थ : एखादा माणूस दोरीला साप समजून घाबरतो. पण प्रकाश पडताच विवेकाने कळते की तो साप नाही. तेव्हा भीती (आसक्ती) नष्ट होते. तसेच जेव्हा आत्मा हेच सत्य आहे हे उमजते, तेव्हा जगाची मोह–माया ओसरते.

## शारीरिक तपासणीची पूर्वतयारी

**डॉ. नीरज रायते (मो. : ९९२२४२७०६७)**

डॉक्टरांकडे जायचे या कल्पनेनेच अनेक जण गर्भगळित होतात. अनेकांना भीती वाटते. अनेकांचा रक्तदाब वाढतो. पण असे भयभीत होण्याने का प्रश्न सुटतात? आपल्याला आपल्या आजाराला सामोरे जाणे आवश्यक असते. अशावेळी पूर्वतयारी करुन गेलो, नियोजन करुन गेलो तर आपल्याला वाटते तेवढे डॉक्टरांना भेटणे अवघड नसते आणि त्रासाचेही नसते! डॉक्टरकडे जाताना काही पूर्वतयारी आवश्यक असते. भारतामध्ये डॉक्टर आणि रुग्ण ह्यांचे प्रमाण व्यस्त असल्यामुळे जर आपण पूर्वतयारी केली तर डॉक्टरचा आणि पर्यायाने आपलाही वेळ वाचतो. खरं तर डिजिटलच्या ह्या युगात आपल्याविषयीची सर्व वैद्यकीय माहिती एकाच ठिकाणी व्यवस्थित केल्यास सर्वांचीच सोय होते. रुग्ण येताना वेगवेगळ्या फाईली, चिठ्या घेऊन येतात आणि मग डॉक्टर ला त्यातून माहिती शोधणे म्हणजे डांगर पोखरून उंदीर काढण्याचे काम आहे. काही रुग्ण तर मोबाईलवर रिपोर्ट्स दाखवतात. काही महाभाग असेही असतात ज्यांनी जन्मापासूनची सर्व माहिती आणि बरीच

**JV MARKETING & INVESTMENTS**
*Premium Residential & Corporate Real Estate Advisor*

*Sales And Marketing Of New Projects*
*Pre-leased Commercial & Retail Options*
*Business & Home Loan Assistance*

*Rahul V. Deshpande* — *+91 98330 25031*
*MBA - Marketing* — *jvmarketinginvestments@gmail.com*

*Samarth Raghukul, Gokhale Road South, Dadar West, Mumbai - 400 028*
*MahaRERA ID - A51900028785* *@jvmarketing18* *jvmarketing18*

**For enquiries and bookings in new projects across Mumbai, Thane and Navi Mumbai, kindly contact Rahul V. Deshpande - 98330 25031**

अनावश्यक माहिती गोळा केलेली असते. एक गोष्ट मात्र खरी रुग्णाने डॉक्टरपासून कोणतीही माहिती कधीही लपवून ठेवू नये. विशेषतः व्यासनाविषयीची माहिती रुग्ण लपवण्याचा प्रयत्न करतात माहिती लपवल्याने डॉक्टर चे निदान चुकू शकते त्याहीपेक्षा रुग्णाचे नक्कीच नुकसान होऊ शकते. एक तज्ञ डॉक्टर तोच असतो जो रुग्णाकडून योग्य आणि सर्व माहिती शिताफीने काढून घेतो .सगळ्यात महत्त्वाचे म्हणजे डॉक्टर ला भेटायला जाताना आपल्याला विचारायच्या प्रश्नांची पूर्वतयारी करुन अशी यादी सोबत नेल्यास आपली डॉक्टरची भेट सफल होते. शक्यतो परिस्थिती गंभीर नसेल तर पूर्वसूचना देऊन, अपॉईंटमेंट घेऊन परस्परांची सोय पाहून डॉक्टरांकडे जावे. म्हणजे आपलाही वेळ जात नाही अन् डॉक्टरांचाही वेळ वाचतो. डॉक्टरांचा वेळ मोलाचा असतो. त्यामुळे त्यांना पुरेशी माहिती उपलब्ध वेळात देणे रुग्णांच्या हिताचेच असते. म्हणून डॉक्टरांकडे गेल्यावर इतर गप्पा मारणे टाळणे इष्टच असते. डॉक्टरकडे जाताना वेळेवर जावे. आवश्यक कागदपत्रे, पुरेसे पैसे आणि एखाद्या जबाबदार व्यक्तीला बरोबर न्यावे. आजार गंभीर असल्यास हॉस्पिटलमध्ये अ‍ॅडमिट होण्याची सिद्धता ठेवून जावे, म्हणजे गोंधळ होणार नाही. डॉक्टरांनी दिलेल्या सूचनांचे तंतोतंत पालन व्हावे. उदाहरणार्थ मधुमेहाची तपासणी करण्यासाठी उपाशीपोटी आणि जेवणानंतर दोन तासांनी रक्त-लघवीची तपासणी करायची असते. उपचाराचा परिणाम पाहण्यासाठी औषधे घेऊनच जावे लागते. रक्तातील ‘कोलेस्टेरॉल’ आणि ‘लिपीड प्रोफाइल’ तपासणी उपाशीपोटी करावी. त्यासाठी तीन दिवस आधी स्निग्ध पदार्थ टाळावे लागतात. मुतखड्यासाठी एक्स-रे काढावयाचा असेल तर आधी रेचक घ्यावे. ‘कोलोनोस्कोपी’ करण्यापूर्वी शौच विसर्जन करुन यावे. गॅस्ट्रोस्कोपी करण्यापूर्वी २-२।। तास आधी काही घेऊ नये. रक्तदाब मोजण्यासाठी शक्यतो सकाळी लवकर जावे. तत्पूर्वी धूम्रपान, जेवण अथवा परिश्रम टाळावे. ऑपरेशनपूर्वी डॉक्टराच्या पूर्वसूचना कटाक्षाने पाळाव्या. वारंवार स्वतःच्या आजारावर स्वत:च प्रयोग करणे शक्य तो टाळावे. कांही वेळा दुसऱ्याच्या आणि आपल्या आजाराचे रोगनिदान एकच असले तरी प्रत्येकाची प्रकृती वेगवेगळी असल्याने औषधोपचार वेगळेवेगळे असतात म्हणून ‘सेल्फ मेडिकेशन’ शक्यतो टाळावे. योग्य त्या अनुभवी कुशल, तज्ज्ञ आणि गुणवंत डॉक्टरांचे मार्गदर्शन घेऊन आपले स्वास्थ्य सांभाळणे आणि जीवनाचा निरामय आनंद घेणे खरे तर आपल्याच हातात असते. अलीकडचे युग जाहिरातीचे आहे. फसव्या जाहिरातीना भुलून अशास्त्रीय उपचार घेऊन आपल्या शरीरावर प्रयोग करायचे की विश्वासार्ह, शास्त्रशुद्ध, प्रमाणित, अनुभवाने परिपूर्ण विज्ञानाचा आधार घ्यायचा याचा निर्णय आपणच घ्यायचा आहे. डॉक्टरांच्याकडे जाताना पूर्वतयारी करुन गेलो, नियोजन करुन गेलो, अपॉईंटमेंट घेऊन गेलो तर रोगनिदान सुलभ होते. म्हणजे आपलाही वेळ जात नाही. अन् डॉक्टरांचाही वेळ वाचतो. लक्षात ठेवा डॉक्टरांचा वेळ मोलाचा आहे. त्याचा अपव्यय होऊ न देणे रुग्णाच्याच हिताचे असते.

## ।।श्री दत्तचरणामृतलहरी।।

**संकलन श्री केदार जोशी**
**(औदुंबर ९८६०६२५७९७)**

श्री दत्तात्रेयांचे दुसरे अवतार म्हणून ब्रम्हांड विख्यात असलेले श्री नृसिंह सरस्वती यांनी सन्यासी रुपात राहून धर्माचा आणि कर्माचा प्रचार व प्रसार केला.श्रींचा जन्म लाडाचे कारंजे ह्या ग्रामात झाला,श्री कृष्ण सरस्वती स्वामींकडून , श्रींनी काशी ह्या क्षेत्री सन्यास दिक्षा घेऊन पुढच्या अभुतपूर्व वाटचालीस प्रारंभ

केला.त्यांच्या ह्या कार्यात त्यांनी अनेक चातुर्मास संपन्न केले. त्यांच्याच अनाकालनीय चातुर्मासां पैकी एक चातुर्मासा श्री क्षेत्र औदुंबर या ठिकाणी इ. स. १४२१ ह्या कालावधीत संपन्न झाला. औदुंबराचे वृक्षातळी। असे तापसी महाबळी। अवतारी पुरुष चंद्रमौळी। तुझी वांछा पुरवील। असे ज्या क्षेत्राचे वर्णन आहे तेच हे क्षेत्र औदुंबर. येथील परीसर शांत आणि निसर्गरम्य असा आहे. श्रींच्या अस्तित्वाच्या गोपनीयतेचा उलगडा, पलीकडे वसलेल्या श्री भुवनेश्वरी देवीने केला. एक मंदमति ब्राम्हण आपल्या मुढपणास कंटाळून देवीस शरण आला, परंतु बहु काळ सरला तरीही देवी त्यास प्रसन्न झाले नाही. शेवटी आपला पूर्णपणे अंत व्हावा ह्या विचाराने, त्यानी आपली जीभ छाटून देवीस अर्पण केली, त्यामुळे त्याला ग्लानी आली. त्याच वेळी त्याच्या स्वप्नात देवी आली आणि पलीकडीच्या तीरावर एक महान तपस्वी ध्यानस्थ बसला आहे त्याला शरण जा! तोच तुझा उद्धार करेल असे म्हणाली. ब्राम्हणास शुद्ध आली आणि तो पलीकडील तीरावर पोहचला. श्रींची त्याच्यावर कारुण्यदृष्टी पडली, त्याची जीभ पुर्ववत झाले. चार वेद अठरा पुराणे त्याच्या जिभेवर रेंगाळू लागली! महाराजांची किर्ती सर्वदूर पसरली. सन्यासींनी एका ठिकाणी फार काळ थांबने वर्ज्य आहे त्यामुळेच श्रींनी ह्या ठिकाणाहून दुसऱ्या ठिकाणी जाण्याची योजना केली. परंतु त्यांच्या शिष्यांना ही योजना फारशी रुचली नाही. त्यामुळे भक्तांनाच्या आग्रहाखातर श्रींनी श्री विमल पादुकांची स्थापना करून सर्वांना कृतकृत्य केले. काळ्या कुट्ट, गुळगुळीत अशा शिवपिंडीवर सर्वप्रथम बेलाचे हिरवीगार ओलसर पान ठेवावे व त्या हिरव्या बिल्व पत्रावर, दुधाच्या एखाद्या नाजुक स्पंदनाचे आगमन होऊन पानाचा तितकाच गोलाकार भाग पांढराशुभ्र व्हावा अशी चंदेरी शुभ्र वंस्त्रांतिका कृष्णा नदी ह्या हिरव्या गडद परिसरात प्रकट झाली आहे! ह्याच नदीकाठी श्रींची अनुष्ठाने होत असत. त्यांच्याच पदकमलाने पावन झालेल्या नदीच्या भुसभुशीत सुगंधप्रदान करणाऱ्या मातीचा स्पर्श साधकाच्या खरखरीत तळव्यांना होताच मनातील अष्टसात्त्विक भाव जागृत होतात. विमल ह्या शब्दाचा अर्थ म्हणजे कोणत्याही प्रकारचा मळ नसलेले, शुचिर्भूत अवस्थेत स्थित, तप तेजाने तळपणारे, असा होतो. श्री विमल पादुकांच्या स्मरण मात्राने मनात चैतन्याचे दत्त तत्व निर्माण होते. श्रींच्या पादुका चौकोनी अशा पाषाणात विराजमान आहेत. ह्या दिव्य चरणांचे विविध प्रकारचे वैदिक मंत्रोच्चाराने पुजनअर्चन केले जाते. खरतर पादुकांचा अभिषेक हा तसा वैशिष्ट्यपूर्ण आणि पाहण्यासारखा असतो. दत्तप्रेमींना दत्ताच्या पादुका प्राणप्रिय असतात त्यामुळेच त्यांच्या संबंधित जोडलेली पुजा ही तितकीच कुतुहल प्रदान करणारी असते. दत्तप्रेमींचे ध्यान पादुकांवर अर्पण केल्या जाणाऱ्या जलाच्या पहिल्या थेंबापासून ते संपूर्ण पुजा संपन्न होताच , श्री चरणांवर ठेवलेल्या शेवटच्या शेवंतीच्या फुलापर्यंत तशीच रोखून असते. हे एक नवलच आहे.ही दैदिप्यमान पुजा पाहताना साधकाचे तनमन दोन्ही श्री चरणी विलीन असते. त्यामुळेच तास दीड तास मान ताठपणे वर केल्यावरही, कण मात्र दुखत नाही. बराच काळ पद्मासनात बसून देखील पायाला मुंग्या येत नाहीत. कारण सर्व ईंद्रियेच महाराजांच्या रुपात एकरूप होतात. श्री पादुकांवर सर्वप्रथम कृष्णाजल अर्पण केले जाते. तदनंतर एका छाटीने पादुका कोरड्या करतात. दुध, दही, मध, केळी, उष्णोदक, उटणे, ह्या सर्व सुशोभित द्रव्यानी अभिषेक घालतात. पाच केळी पादुकांवर गोलाकार आकृतीत रचून त्यातील प्रत्येक केळे कुस्करून पादुकांवर ठेवले जाते. अमावस्येच्या काळ्याभोर नभात अलगदपणे पूर्णाकृती चंद्र यावा तसेच काहीसे, पाषाणात कोरलेली दोन्ही गुरु पावले आणि दुधाचा संगम दिसून येतो. वरून पडणारी निळाशार पाण्याची अरुंद धारा एक निराळीच जलमय आकृती घेऊन गुरु चरणांना आलिंगन देत असते, ती खाली अवतरित होताच चारी दिशांवर आणि चारी उप दिशांवर उडणारी स्फटिक स्पंदने समस्त सकल दिशांना तृप्त करीत असतात. एकीकडे पुजारी हा अभिषेकाचा विधी पुर्ण करत असतानाच दुसरीकडे चंदनाचे दोन मोठे (पादुकांना समावून घेतील असे) गोळे तयार केले जातात. जणू आत्मलिंगाच्या आकारा सारखे भासणारे हे गोळे पादुकांवर ठेवले

जातात. त्या दोन्ही चंदन शितील गोळ्यांचा आकारात दोन्ही गुरु पावले झाकून जातात. अष्टदिशांवर सुपारी एवढी गंध गोळ्या ठेवल्या जातात. तदनंतर पौर्णिमेच्या रात्रीस मागे सारून प्रतिपदेचा तेजोमय भास्कर घेऊन येणाऱ्या सोनेरी केशरी पहाटे प्रमाणे, ह्या पाषाणावर भगव्या रंगाची छाटी अंथरली जाते. ब्रम्हानंदात तल्लीन झालेले सुखावलेले मन पुन्हा एकदा जागृत अवस्थेत येऊन विचार करते खरंच ह्या छाटीची गरज आहे का? भगव्या छाटीवर, पादुका कोरलेला चांदीचा एक पाठ ठेवला जातो. ह्या चांदीच्या पाटावरील पाऊले पाहून , पुन्हा एकदा मनास भुरळ पडते. ह्या चरणांवर पिवळी जर्द शेवंती, घमघमता टपोरा मोगरा, लालभडक अनेक पाकळ्या एकमेकांवर असलेली जास्वंद आणि चांदण्यां प्रमाणे भासणारी नाजुक साजुक जाई जुई, मोठ्या श्रद्धावन्त भावनेने वाहिली जातात. वर पुन्हा एक छाटी अंथरून त्यावर कधी एकमुखी तर कधी त्रिमुखी अशा मुखवट्याची पुजा बांधली जाते. हा मुखवटा पाहून साधकाच्या मनात निर्माण होणाऱ्या स्थितीचे वर्णन अवर्णनीय आहे! कारण प्रत्येक साधकाच्या मनात ह्या अलौकिक रुपाची व्याख्या निरनिराळी आहे हे ही तितकेच खरे! अशा प्रकारे ही पंचोपचार आणि षोडशोपचार पुजा संपन्न होते. मनातील रसातळाला उगम पावणारे अविनाशी चैतन्य आता आरतीच्या तालावर थिरकायला लागते. श्रींना नैवेद्य दाखविला जातो. साधकाची मानसिक स्थिती खरचं विलक्षण झालेली असते. आरतीची सांगता होताच, देवालयातील लगबग शांत होते. भक्तांची गर्दी कमी होते.मध्यान काळात प्रखर तेजाने तळपणारा सुर्य कृष्णेच्या मस्तकावर येतो. कोमट झालेल्या पाण्यावर पडलेल्या मुठभर कुमकुम मिश्रीत लालबुंद अक्षता रविकिरणामुळे अदभुत माणिकांप्रमाणे लखलखत असतात.

## सलग्न संस्था वृत्त

✻ **मुंबई** : अखिल देशस्थ ऋग्वेदी ब्राह्मण मध्यवर्ती मंडळातर्फे संस्थेच्या लक्ष्मीनारायण बाग, बाळ गोविंददास रोड, माहिम, सभागृहात दि. १५ ऑगस्ट २०२५ रोजी विद्यार्थ्यी गुणगौरव सोहळा संपन्न झाला. कार्यक्रमाची सुरूवात दीप प्रज्वलन करून करण्यात आली. या कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे म्हणून न्यायाधीश श्री. संजीव पिंगळे, श्री. वैभव कुलकर्णी तसेच कल्याण जनता सहकारी बँकेचे श्री. अतुल खिरवाडकर, डॉ. ॲड. सौ. साधना महाशब्दे, ॲड. आंनद नायक तसेच श्री. जगन्नाथ कृष्णाजी जोशी डोंबिवली संस्थेचे अध्यक्ष व संस्थेचे पदाधिकारी हे उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन श्री. आनंद कुलकर्णी आणि सौ. सुनिता राझेकर यांनी केले व कार्यक्रमाचे प्रास्ताविक श्री. मिलिंद सरदेशमुख (कार्यवाह) यांनी केले. या कार्यक्रमास दादर आणि माहिम परिसरातील सर्व शाळा व महाविद्यालयाचे तसेच ज्ञातीतील सर्व विद्यार्थी / विद्यार्थीनी आणि पालक मोठया संख्येने उपस्थित होते. दादर, माहिम मधील शाळा आणि महाविद्यालयातील प्रथम तीन आलेल्या तसेच ज्ञातीतील उत्तम गुणांनी उत्तीर्ण झालेल्या विद्यार्थी / विद्यार्थीनींचा सत्कार प्रशस्तीपत्रक आणि पारितोषिक मान्यवरांच्या हस्ते देऊन करण्यात आला. उपस्थित विद्यार्थी आणि कांही पालकांनी संस्था करीत असलेल्या या उपक्रमाबद्दल आंनद व्यक्त केला. उपस्थित विद्यार्थी, पालकांना अल्पोपहाराची व्यवस्था मयुर कॅटरर्स यांनी उत्तमपणे पार पाडली. कार्यक्रमाचे आभार प्रदर्शन श्री. आंनद कुलकर्णी यांनी केले.

✻ दि. १५ऑगस्ट २०२५ रोजी स्वातंष्य दिनाचा सोहळा अखिल देशस्थ ऋग्वेदी ब्राह्मण मध्यवर्ती मंडळ, लक्ष्मीनारायण बाग, बाळ गोविंददास रोड, माहिम, सभागृहात पार पडला. स्वातंष्य दिनानिमित्त मध्यवर्ती संस्थेचे कार्यवाह श्री. नितिन शहापूरकर (बडोदे) आणि श्री. रमेश रामराव पाटील पदाधिकारी यांच्या हस्ते

ध्वजारोहण करण्यात आले. या प्रसंगी दादर, माहिम परिसरातील सदस्यांनी सहभाग नोंदविला. ध्वजारोहणाची संपूर्ण तयारी संस्थेचे कर्मचारी निखिल कदम याने उत्तमरित्या पार पाडली प्रसंगी फुलांची आरास आणि रांगोळीची पूर्व तयारी संस्थेच्या कर्मचारी उर्मिला तांबे आणि कोमल उनवणे या दोघींनी केली. श्री. नितिन शहापूरकर यांनी समायोचीत विचार उपस्थितांना दिले आणि स्वंतष्य दिनाच्या शुभेच्छा संपूर्ण भारतवासियांना दिल्या.

✻ **मुलुंड** : देशस्थ ऋग्वेदी ब्राह्मण संस्था मुलुंड तर्फे शुक्रवार दिनांक ८-८-२०२५रोजी संस्थेच्या सभागृहात श्रावणोत्सव आयोजित करण्यात आला होता. संध्याकाळी ५ ते ७ या वेळेत. हा कार्यक्रम समाजातील सर्व रसिक महिलांसाठी होता. १५ ऑगस्टच्या पार्श्वभूमीवर 'देशभक्तीवर गीत किंवा स्वातंत्र्यवीर/ वीरांगना सादरीकरण करणे अशी कार्यक्रमाची रूपरेषा ठरवली होती. कार्यक्रमाची सुरुवात सामूहिक श्री सूक्त पठणाने झाली.एकूण ९ जणींचा सादरीकरणात सहभाग होता. ९-८-२०२५ हा दिवस यावर्षी दोन प्रकारे विशेष आहे. १) रक्षाबंधन- या दिवसाचे औचित्य साधत सर्व भगिनींनी एकमेकांना राख्या बांधल्या. एकमेकींचे रक्षण करण्यासाठी सज्ज आहोत हे एकजुटीने दाखवले. ही संकल्पना सर्वांना ही खूप आवडली असे त्यांनी आवर्जून सांगितले. २) ऑगस्ट क्रांती दिन- क्रांती दिनाच्या औचित साधून डॉ.सौ.प्रेरणा क्षीरसागर (महिला शाखा अध्यक्षा) यांनी 'वंदे मातरम्' बद्दलची अप्रकाशित माहिती सांगितली.यामध्ये खरी किती कडवी आहेत. फाशीवर जाणाऱ्या क्रांतिकारकांचे 'वंदे मातरम्' हे घोषवाक्य कसे झाले हे सर्व सांगितले. संपूर् सभागृह 'वंदे मातरम्' च्या घोषणेने दुमदुमले.अतिशय वेगळी माहिती सगळ्यांना ऐकायला मिळाली. सहभागी महिलांचे डॉ.सौ.प्रेरणा क्षीरसागर (महिला शाखा अध्यक्षा) सौ.उज्वला जोशी (महिला शाखा उपाध्यक्षा) यांच्या हस्ते तुळशीचे रोप देऊन कौतुक करण्यात आले. तद्नंतर सर्व महिलांनी आपले पारंपरिक मंगळागौरीचे खेळ खेळत


**JAYANT DESHMUKH**
B.COM., CAIIB DBM

**Dr. AMIT DESHMUKH**
*Assistant Professor* B.Com., MA., Ph.D.

• Authorised Insurance Advisor • Investment Consultant
• Mediclaim • AMFI Registered Mutual Fund Partner

M. : 9930445721 / 9702837022 deshisbijayant@gmail.com

Off. : 106, Shrivatsam, First Avenue Business Park, Durgadi Chowk, Kalyan West - 421201
Resi. : Shree Ram Tower, Near Jain Society, Kalyan (West) 421301

◎ Director - MPFC Udyog Nidhi Ltd., Kalyan
◎ Prudent Partner - Mutual Fund Distributor / Company Deposit / Insurance
◎ Trustee & Treasurer - Balaji Mandir Trust, Kalyan
◎ President - Karnataka Sangha, Kalyan
◎ Past Vice President - Andhra Association, Kalyan
◎ Past Manager - State Bank of India
◎ Housing Loan Provider
◎ Member - BBNG Kalyan
◎ Manager - Laxmi Narayan Vadhu-Var Suchak Kendra, Kalyan
◎ Joint Treasurer - DRBS Kalyan

◎ Certified Astrologer
◎ Meditation
◎ Palmist
◎ Yoga
◎ Numerologist
◎ Vastu
◎ Bhakti Shastri
◎ Cyber Crime Investigator

आनंद लुटला.सर्व महिलांना हळद-कूंकू, अत्तर लावून चाफ्याचे फूल व चणे-दाणे दिले.सर्वांनी मसाला दूधाचा आस्वाद घेतला. महिला शाखा कार्यकारिणी सदस्यांच्या एकजुटीने कार्यक्रम अतिशय सुंदर व आशयघन झाला. संस्थेचे अध्यक्ष श्री. अशोक जहागिरदार व विश्र्वस्त प्रमुख श्री.विजय वडगबाळकर सपत्नीक उपस्थित होते.बंधूवर्गही आवर्जून उपस्थित होता. देशस्थ ऋग्वेदी ब्राह्मण संस्था मुलुंड ची ४८वी वार्षिक सर्वसाधारण सभा रविवार दिनांक १७-८-२०२५ रोजी संस्थेच्या सभागृहात संपन्न झाली. सभेची सुरुवात सामूहिक शांती मंत्राने झाली. संस्थेतील ज्ञात-अज्ञात दिवंगत सदस्य, सैनिक, 'ऑपरेशन सिंदूर' मधील शहीद यांना श्रद्धांजली वाहण्यात आली.संस्थेचे विश्वस्त प्रमुख श्री.विजय वडगबाळकर यांनी सभेचे अध्यक्ष पद भूषविले.कार्यवाह श्री नितीन देशपांडे यांनी सर्वांचे स्वागत केले. श्री.प्रकाश लोणकर (सहकार्यवाह) यांनी सप्टेंबर २०२४ मध्ये झालेल्या सर्व साधारण सभेचे इतिवृत्त वाचले.सर्वांनी त्यास मंजुरी दिली. पुढील सर्व मुद्दे सर्वानुमते मंजूर झाले. अतिशय खेळीमेळीच्या वातावरणात सभा पार पडली श्री.भगवान अडगावकर (कार्याध्यक्ष) यांनी सर्वांचे आभार मानले.

*** पुणे, कोथरूड :** देशस्थ ऋग्वेदी ब्राह्मण संघाच्या कोथरूड-कर्वेनगर शाखेच्या नवीन कार्यालयाचे उद्घाटन दिनांक ५ सप्टेंबर २०२५ रोजी उच्च व तंत्रशिक्षण आणि संसदीय कामकाज मंत्री, आणि कोथरूड चे सक्षम आमदार आदरणीय श्री चंद्रकांत दादा पाटील यांच्या हस्ते झाले. देशस्थ ऋग्वेदी ब्राह्मण संघाच्या माध्यमातून समाज आणि समाजबांधवांच्या हितासाठी प्रयत्न करावेत, असे आवाहन करीत सर्वतोपरी सहकार्य करू अशी ग्वाही पाटील यांनी या प्रसंगी दिली. देशस्थ ऋग्वेदी ब्राह्मण संघाच्या सचिव केतकी कुलकर्णी यांच्या पुढाकारातून कोथरूड, कर्वेनगर परिसरातील पितृछाया बंगला, प्रतिज्ञा मंगल कार्यालया पासून जवळ असलेले आणि आवश्यक सोयीसुविधांनी युक्त कार्यालय सुरू करण्यात आले आहे. या कार्यालयाचे उद्घाटन श्री चंद्रकांत दादा पाटील यांनी फित कापून केले. मुबंई अखिल ब्राह्मण देशस्थ ऋग्वेदी संस्थेचे राष्ट्रीय अध्यक्ष श्री भैय्यासाहेब गंधे, कार्याध्यक्ष प्रभाकर कुलकर्णी, कार्यवाह मिलिंद सरदेशमुख, सल्लागार श्री अरविंद हस्तेकर तसेच पुणे शाखेचे अध्यक्ष डॉ. अरुण हुपरीकर यांची उपस्थिती होती. प्रास्ताविकात पुणे शाखेच्या सचिव केतकी कुलकर्णी यांनी देशस्थ ऋग्वेदी ब्राह्मण संघाचे कार्यालय सुरू करण्यासाठी सहकार्य केल्याबद्दल मंत्री आदरणीय श्री चंद्रकांत दादा पाटील यांचे आभार व्यक्त केले. संस्थेविषयी माहिती देताना त्या म्हणाल्या, सामाजिक बांधिलकीतून संस्था कार्यरत असून भविष्यात विविध उपक्रम राबविण्याचा मानस आहे.उद्घाटनपर मनोगत व्यक्त करताना आदरणीय श्री चंद्रकांत दादा पाटील म्हणाले, समाजातील प्रत्येक समाज घटकाने आपल्या ज्ञाती बांधवांच्या विकासासाठी प्रयत्न करणे यात काही चूक नाही. सामाजिक, सांस्कृतिक उपक्रमांमुळे समाजघटक एकत्र येण्यास मदतच होते. शिक्षण, आरोग्य, उद्योग, व्यवसाय असे उपक्रम राबविण्यावर देशस्थ ऋग्वेदी ब्राह्मण संघाने भर द्यावा, असे आवाहनही त्यांनी केले.या कार्यक्रमासाठी देशस्थ ऋग्वेदी कोथरूड कर्वेनगर शाखेचे सर्व कार्यकारी मंडळ उपस्थित होते.जयश्री घाटे, मेघना पत्की, डॉ किमया देशपांडे, दीपा हसबनीस, यांनी विशेष मेहनत घेतली. डॉ कांचन खैरटकर यांनी ईशस्तवन सादर केले श्री स्वप्निल जोशी यांनी प्रभावी सूत्रसंचालन केले व किमया देशपांडे यांनी आभार मानले.तसेच अविनाश सलगरकर, सतीश कुलकर्णी, ध्रुव देशपांडे आणि सर्वजण उपस्थित होते.या कार्यक्रमासाठी अनेक वेगळ्या वेगळ्या क्षेत्रातून मान्यवर आले होते आणि त्यांनी नवीन ऑफिस उद्घाटना बद्दल सर्वांचे अभिनंदन केले.अखिल देशस्थ ऋग्वेदी ब्राह्मण माहीम कार्याध्यक्ष माननीय श्री प्रभाकर पंत कुलकर्णी यांनी कोथरूड कर्वेनगर शाखेला सर्वतोपरी मदत करण्याचे आश्वासन दिले आणि खूप शुभेच्छा दिल्या. कार्यवाह श्री मिलिंद सरदेशमुख यांनी देशस्थ ऋग्वेदी चे समाचार पत्रिका आणि मध्यवर्ती करीत असलेल्या कार्याबाबत माहिती दिली. तसेच या उद्घाटनासाठी श्री

तुषार काकडे, मुंबईहून श्री रमेश पाटील, ड. सौ व श्री ओंकार तडवळकर, श्री मंदार शहाणे, सौ स्मिता धामणगावकर, तसेच बुधवार पेठ शाखेचे अध्यक्ष श्री राजेंद्र कुलकर्णी, डॉक्टर श्री संदीप बुटाला आणि अनेक मान्यवर उपस्थित होते.उपस्थित असलेल्या अनेकांनी कोथरूड शाखेचे सभासद होण्यासाठी तसेच जास्तीत जास्त ओळखीतले देशस्थ ऋग्वेदी सभासद करण्यासाठी मदत करणार असल्याचे सांगितले आणि अनेकांनी पुढील काळात संस्थेला देणगी देऊ असेही नमूद केले. सर्व उपस्थितांना पेढे तसेच चविष्ट अल्पोपहार देऊन हा आनंदमय उद्घाटन सोहळा  संपन्न झाला.

* **बडोदे (गुजरात)** : महाराष्ट्र शासनाच्या सांस्कृतिक कार्यसंचालनालय मुंबईतर्फे महाराष्ट्राबाहेरील मराठी भाषिक लोकांना मराठी अस्मिता आणि परंपरा याची संस्कृती घडविणारा एक सुंदर कार्यक्रम सर सयाजीराव नाटयगृह वडोदरा (गुजरात) येथे दि. ४ सप्टेंबर २०२५ रोजी पार पाडला. बडोद्यात मराठी संस्कृतीची ध्वजा फडकविणारी देशस्थ ऋग्वेदी ब्राह्मण मंडळ या संस्थेची नोंद महाराष्ट्र शासनाने घेतली. या संस्थेचे कार्यवाह श्री. नितीन शहापूरकर यांचा पुष्पगुच्छ देऊन सत्कार करण्यात आला. मा. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी गणेशोत्सवाला राज्यमहोत्सव दर्जा दिल्यानिमित्ताने हा विशेष सांस्कृतिक सोहळा आयोजित करण्यात आला होता. या महोत्सवात गणेश वंदना, कोळी गीत, गोंधळ व गवळण, भारूड, पोवाडा, धनगर नृत्य अशा विविध लोक सांस्कृतिक कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. ४० लोक कलाकांराचा भव्य लोकरंगोत्सव रसिकांसमोर सादर केला गेला. बडोदा येथील देशस्थ ऋग्वेदी ब्राह्मण संस्थेचा गौरव ही या कार्यक्रमाची विशेष बाब होती. बडोदा (गुजरात) येथे मराठी संस्कृती गेल्या ६,७ दशकांपासून देशस्थ ऋग्वेदी ब्राह्मण मंडळातर्फे अव्याहतपणे राबविली जात आहे. देशस्थ ऋग्वेदी ब्राह्मण संस्थेचा गौरव महाराष्ट्र शासनाच्या सांस्कृतिक कार्यसंचालनातर्फे झाल्याने महाराष्ट्र मंत्रालयाचे आभार समस्थ बडोदेकरांनी व्यक्त केले आहे.

## जोडीदार निवडा

**वधू पाहिजे** ..........................................................................................

* **प्रदूमना श्रीराम चिपळूणकर (देशस्थ ऋर्वेदी ब्राह्मण), जन्म तारीख :** १७/१२/१९९५, **जन्म वेळ :** पहाटे ५.३०, **जन्म ठिकाण :** मुंबई, **उंची :** ५.६, **गोत्र :** अत्री, **रास :** कन्या, **नक्षत्र :** हस्त, **नाडी :** आद्य, **गण :** देव, **शिक्षण :** S>Ê M.Sc, **नोकरी/ व्यवसाय :** एस. एम. बीसी. बँक, **वार्षिक उत्पन्न :** ६.५ लाख, **अपेक्षा :** अनुरूप, **संपर्क :** ९६९९७६६६४३/९६६४८४१७८४

* **ऋत्विज प्रफुल्ल कुलकर्णी (देशस्थ ऋर्वेदी ब्राह्मण), जन्म तारीख :** २८/११/१९९५, **जन्म वेळ :** सकाळी १०.१०, **जन्म ठिकाण :** ठाणे, **उंची :** ५.५, **रक्तगट :** ओ (+), **गोत्र :** काश्यप, **रास :** मकर, **नक्षत्र :** धनिष्ठा, **नाडी :** मध्य, **गण :** राक्षस, **शिक्षण :** B.E.(Electronics & Telecommunication), **नोकरी/ व्यवसाय :** नोकरी, **वार्षिक उत्पन्न:** ४.५० लाख, **अपेक्षा :** सुशिक्षित आणि सुसंस्कारी, नोकरी करणारी, **संपर्क :** ९८२०९८४७९३/९३२२५९०४६६

* **तुषार भारत संगम (देशस्थ ऋर्वेदी ब्राह्मण), जन्म तारीख :** १८/०३/१९९५, **जन्म वेळ :** दुपारी ३.०५, **जन्म ठिकाण :** कल्याण, **उंची :** ५.८, **रक्तगट :** एबी (+), **गोत्र :** काश्यप, **रास :** कन्या, **नक्षत्र :** हस्त, **नाडी :** आद्य, **गण:** देव, **शिक्षण :** B.E, MS CS from UCF, **नोकरी/ व्यवसाय :** California, **वार्षिक उत्पन्न :** ४.५० लाख, **अपेक्षा:** एक दोन वर्ष फॉरेनला राहणारी, उच्च शिक्षित इंजिनीर प्राधान्य, **संपर्क :** ९८२०८७३०५९/९८२०३३६५२९

* **सुदर्शन सुधाकर जोशी (देशस्थ ऋर्वेदी ब्राह्मण), जन्म तारीख :** १६/०३/१९९५, **जन्म वेळ :** दुपारी ०१.४५, **जन्म**

**ठिकाण :** ममदापूर (विजापूर), **उंची :** ५.८, **गोत्र :** भारव्दाज, **रास :** सिंह, **नक्षत्र :** पूर्वा चरण, **नाडी :** मध्य, **गण :** मनुष्य, **शिक्षण :** पीजीडीएम मार्केटिंग (व्हीपीएम कॉलेज), **नोकरी/ व्यवसाय :** पितांबरी प्रॉडक्ट्स प्रायव्हेट लिमिटेड सेल्स डेव्हलपमेंट मॅनेजर, **वार्षिक उत्पन्न :** ५ लाख, **अपेक्षा :** सुसंस्कृत आणि शिष्टाचारी आणि संयुक्त कुटुंबात राहण्यास तयार, **संपर्क :** ७०४५०७१०७७

*** ऋषिकेश कृष्णा कुलकर्णी (देशस्थ ऋग्वेदी ब्राह्मण), जन्म तारीख :** ०६/०४/१९९६, **जन्म वेळ :** सकाळी ११.४२, **जन्म ठिकाण :** ठाणे, **उंची :** ५.०८, **रक्तगट :** बी (+) **गोत्र :** कौशिक, **रास :** तुळ, **नक्षत्र :** विशाखा, **नाडी:** अंत्य, **गण :** राक्षस, **शिक्षण :** B.Com., **नोकरी/ व्यवसाय :** आय. डी. एफ. सी. बँक, **वार्षिक उत्पन्न :** ४ लाख, **अपेक्षा :** पदवीधर, मनमिळावू, आई वडीलांना संभाळून घेणारी, **संपर्क :** ९०८२४७३१०१/९८६७२४४६१७

*** सर्वेश अतुल कुलकर्णी (देशस्थ ऋग्वेदी ब्राह्मण), जन्म तारीख :** २२/०६/१९९७, **जन्म वेळ :** दुपारी ३.४५, **जन्म ठिकाण** : विटा सांगली (महाराष्ट्र), **उंची :** ५.५, **रक्तगट :** ओ (+), **गोत्र :** अगस्थी, **रास :** धनु, **नक्षत्र :** उत्तराषाढा, **नाडी :** अंत्य, **गण :** मनुष्य, **शिक्षण :** B.Com + IT languages Certification, **नोकरी/ व्यवसाय :** Working in MNC company as a softwere support engineer, **वार्षिक उत्पन्न :** ४ लाख, **अपेक्षा :** अनुरूप, सुस्वभावी, मनमिळाऊ, एकत्र कुटंबात राहू शकणारी, **संपर्क :** ७७५६८५३९५३

*** कपिल संदीप पुंडे (देशस्थ ऋग्वेदी ब्राह्मण), जन्म तारीख :** ३०/०७/१९९८, **जन्म वेळ :** रात्री ९.४६, **जन्म ठिकाण :** अहमदाबाद, **उंची :** ५.७, **रक्तगट :** ओ (-), **गोत्र :** जामदग्नि, **रास :** तूळ, **नक्षत्र :** चित्रा, **गण :** राक्षस, **शिक्षण :** BA-History, MBA (Travel & Tourism-IITTM), IATA-Foundation, **नोकरी/ व्यवसाय :** Balmer Lawrie Co.Pvt.Ltd (Government of India Ent)-Pune Division, **वार्षिक उत्पन्न :** ४.३१लाख, **अपेक्षा :** सुस्वरूप, सडपातळ, मनमिळाऊ, मिश्र आहारी, नोकरी करणारी, मुलापेक्षा एक ते दोन वर्ष लहान, उंची ५.३ ते ५.५, **संपर्क :** ९९२३३९१०७२

*** हर्षवर्धन मोगलगिद्दी (देशस्थ ऋग्वेदी ब्राह्मण), जन्म तारीख :** ०४/०६/१९९९, **जन्म वेळ :** सकाळी ०७.४५, **जन्म ठिकाण :** हैदराबाद, **उंची :** ६.००, **गोत्र :** कौन्दीन्या, **रास :** मकर, **नक्षत्र :** श्रावण, **नाडी :** अंत्य, **गण :** देव, **शिक्षण :** CSE, Pursuing M.Tech, **नोकरी/ व्यवसाय :** Business & Service (Training & Placement Officer in Sridevi Womens Engg. College, Hyderabad, **वार्षिक उत्पन्न :** २५ लाख, **अपेक्षा :** Suitable manmilau, adjustable, Job holder, age gap 2 to 3 years, **संपर्क :** ९६१८०१९६४४/९१७७७०७३४०

*** आनंद विजय चाव्हरे (देशस्थ ऋग्वेदी ब्राह्मण), जन्म तारीख :** २०/०९/१९८९, **जन्म वेळ :** सकाळी ०८.०२, **जन्म ठिकाण :** वरळी, **उंची :** ५.५, **गोत्र :** वसिष्ठ, **रास :** वृषभ, **नक्षत्र :** कृतिका, **नाडी :** अंत्य, **गण :** राक्षस, **शिक्षण:** १२वी उच्च माध्यमिक शांलात परिक्षा उत्तीर्ण, बी.बी.ए करीत आहे, **नोकरी/ व्यवसाय :** सहकारी बँक, कल्याण, **वार्षिक उत्पन्न :** २ लाख ५० हजार, **अपेक्षा :** समकक्ष, व्यवसाय/, नोकरी असल्यास प्राधान्य, कोणत्याही शाखेची, एकत्र कूंटुंबात राहणारि, गृहकर्तव्य दक्ष, **संपर्क :** ९८३३७१७३५१

*** सिध्देश विलास तांबे (कऱ्हाडे ब्राह्मण), जन्म तारीख :** ०१/०४/१९९१, **जन्म वेळ :** दुपारी १२.४५, **जन्म ठिकाण** : गोरेगाव, **उंची :** ५.११, **रक्तगट :** बी (+), **गोत्र :** गारग्य, **रास :** तूळ, **नक्षत्र :** उत्तराषाढा, **नाडी :** अंत्य, **गण :** देव, **शिक्षण :** १२जी पास, सॉफ्टवेअर/हार्डवेअर कोर्स पूर्ण, **नोकरी/ व्यवसाय :** कॅटरिंग व्यवसाय, **वार्षिक उत्पन्न :** ५ लाख, **अपेक्षा :** अनुरूप, व्यवसायात मदत करणारी, समंजस, **संपर्क :** ९८२१७२९४७२

*** सर्वेश रामकृष्णा नायक (सारस्वत ब्राह्मण), जन्म तारीख :** ०५/०१/१९९४, **जन्म वेळ :** सकाळी ११.५७, **जन्म ठिकाण :** कल्याण, **उंची :** ५.९, **रक्तगट :** ए (-), **गोत्र :** कश्यप, **रास :** कन्या, **नक्षत्र :** चित्रा, **नाडी :** मध्य, **गण :** राक्षस, **शिक्षण :** B.E., **नोकरी/ व्यवसाय :** कल्याण, **वार्षिक उत्पन्न :** २० लाख, **अपेक्षा :** अनुरूप, **संपर्क :** ९६१९३८६६९४

*** प्रसाद प्रमोद जोशी (देशस्थ यजुर्वेदी ब्राह्मण), जन्म तारीख :** २३/१०/१९९४, **जन्म वेळ :** दुपारी २.०१, **जन्म**

**ठिकाण :** कल्याण , **उंची :** ५.६, **गोत्र :** सैंधव, **रास :** वृषभ, **नक्षत्र :** रोहिणी, **नाडी :** अंत्य, **गण :** मनुष्य, **शिक्षण :** B.Com., **नोकरी/ व्यवसाय :** Sound Designer/Engineer & Mix Eengineer in Summit Studios, Andheri, **वार्षिक उत्पन्न :** ५ लाख, **अपेक्षा :** नोकरी अथवा व्यवसाय करणे अपेक्षित, अनुरूप, समजुतदार आणि आश्वासक, **संपर्क :** ९४२२३०९६०८/९८३३४६९९०८/७२०८३६३६५३

*** संकेत गिरीश गोडखिंडी (देशस्थ यजुर्वेदी ब्राह्मण), जन्म तारीख :** २६/१२/१९९५, **जन्म वेळ :** रात्री १०.००, **जन्म ठिकाण :** डोंबिवली, **उंची :** ५.१०, **रक्तगट :** बी (+), **गोत्र :** कौन्दीन्या, **रास :** कूंभ, **नक्षत्र :** शततारका, **नाडी:** आद्य, **गण :** राक्षस, **शिक्षण :** B E PGDM, **नोकरी/ व्यवसाय :** L & T Airoli, **वार्षिक उत्पन्न :** १० लाख, **अपेक्षा:** अनुरूप, **संपर्क :** ७०४५०७२८४५/९९६९६१३७५५

*** स्वप्नील संजय अभ्यंकर (कोकणस्थ ब्राह्मण), जन्म तारीख :** २५/१०/१९९५, **जन्म वेळ :** सकाळी १०.१८, **जन्म ठिकाण :** कल्याण, **उंची :** ५.८, **रक्तगट :** ओ (+), **गोत्र :** वसिष्ठ, **रास :** तुला, **नक्षत्र :** विशाखा, **नाडी :** अंत्य, **गण :** राक्षस, **शिक्षण :** B.E., **नोकरी/ व्यवसाय :** खाजगी, **वार्षिक उत्पन्न :** १३ लाख, **अपेक्षा :** अनुरूप, **संपर्क :** ९८९२५०५२३५/८९७६३२१२२०

*** कौस्तुभ प्रमोद ठोसर (कोकणस्थ ब्राह्मण), जन्म तारीख :** ०२/०२/१९९५, **जन्म वेळ :** सकाळी ०७.४८, **जन्म ठिकाण :** बोर्ली रायगड, **उंची :** ५.८, **रक्तगट :** बी (+), **गोत्र :** भारव्दाज, **रास :** कूंभ, **नक्षत्र :** अर्द्र, **नाडी :** आद्य, **गण :** राक्षस, **शिक्षण :** B.Com, LL.B, **नोकरी/ व्यवसाय :** खाजगी, **वार्षिक उत्पन्न :** ४ लाख, **अपेक्षा :** अनुरूप, **संपर्क :** ९८२२४७३८८२/९८८१५३९१७६

*** अमोद सुधीर लोंढे (कोकणस्थ ब्राह्मण), जन्म तारीख :** १९/०८/१९९५, **जन्म वेळ :** सकाळी ४.३०, **जन्म ठिकाण :** भिवंडी, **उंची :** ५.५, **रक्तगट :** ए (+), **गोत्र :** गारग्य, **रास :** वुषभ, **नक्षत्र :** रोहिणी, **नाडी :** अंत्य, **गण:** मनुष्य, **शिक्षण :** १२जी, **नोकरी/ व्यवसाय :** पौराहित्य, **वार्षिक उत्पन्न :** ४ लाख, **अपेक्षा :** अनुरूप, **संपर्क :** ९९८७४७५१८६/९८९२९१६२३४

*** संदीप संजय जोशी (कोकणस्थ ब्राह्मण), जन्म तारीख :** २८/०६/१९९५, **जन्म वेळ :** संध्याकाळी ६.५९, **जन्म ठिकाण :** डोंबिवली, **उंची :** ५.४, **रक्तगट :** एबी (+), **गोत्र :** अत्री, **रास :** मिथुन, **नक्षत्र :** आर्द्रा, **नाडी :** मध्य, **गण :** मनुष्य, **शिक्षण :** B.Com Post graduation, NIIT certification course of 3years, **नोकरी/ व्यवसाय :** Team Leader in Finance field in MNC company, **वार्षिक उत्पन्न :** ६ लाख, **अपेक्षा :** नोकरी करणारी, आई वडिलांबरोबर राणारी, **संपर्क :** ८१०८२३७८११/८९७६१३७३७०

*** अनिकेत संजय पाठक (देशस्थ यजुर्वेदी ब्राह्मण), जन्म तारीख :** ०८/१०/१९९६, **जन्म वेळ :** सकाळी ०७.१५, **जन्म ठिकाण :** अंधेरी (मुंबई), **उंची :** ५.६, **रक्तगट :** ए (+), **गोत्र :** वसिष्ठ, **रास :** सिंह, **नक्षत्र :** मघा, **नाडी :** अंत्य, **गण :** राक्षस, **शिक्षण :** B.Sc, MSCIT Certified, **नोकरी/ व्यवसाय :** Titan Laboratories PVT LTD, **वार्षिक उत्पन्न :** ३ लाख, **अपेक्षा :** सुसंस्कृत, छोटी मोठी नोकरी, **संपर्क :** ९८७०५३५३२५/९८७०५३५३२६

**वर पाहिजे ..........................................................................................**

*** आश्लेषा सुधीर रानडे (कोकणस्थ ब्राह्मण), जन्म तारीख :** २९/०७/१९९३, **जन्म वेळ :** सकाळी ८.२०, **जन्म ठिकाण :** ठाणे, **उंची :** ५.२, **रक्तगट :** ए (+), **गोत्र :** भारव्दाज, **रास :** कर्क, **नक्षत्र :** आश्लेषा, **नाडी :** अंत्य, **गण:** राक्षस, **शिक्षण :** PHD (Veterinary Science), **नोकरी/ व्यवसाय :** असि. प्रोफेसर, **वार्षिक उत्पन्न :** ७ लाख, **अपेक्षा :** उच्च शिक्षित, **संपर्क :** ९८२१०८९००३

✻ **मनाली धनंजय सप्रे (कऱ्हाडे ब्राह्मण), जन्म तारीख :** २५/०८/१९९५, **जन्म वेळ :** दुपारी २.५५, **जन्म ठिकाण:** डोंबिवली, **उंची :** ५, **रक्तगट :** एबी (+), **गोत्र :** अत्री, **रास :** कर्क, **नक्षत्र :** आश्लेषा, **नाडी :** अंत्य, **गण :** राक्षस, **शिक्षण :** B.Com., **नोकरी/ व्यवसाय :** खाजगी, **वार्षिक उत्पन्न :** २ लाख, **अपेक्षा :** कल्याण, डोंबिवलीत राहणारा, **संपर्क :** ८५९१०१६०३३/७०२१९८७३२७

**(टीप : स्थळांची माहिती पडताळून घेण्याची जबाबदारी मंडळ घेणार नाही, ती तुमची स्वत:ची राहील)**

## अखिल देशस्थ ऋग्वेदी ब्राह्मण मध्यवर्ती मंडळ

## वार्षिक सर्वसाधारण सभेची अग्रसूचना

अखिल देशस्थ ऋग्वेदी ब्राह्मण मध्यवर्ती मंडळ, माहिम, मुंबई ४०००१६ या संस्थेची वार्षिक सर्वसाधरण सभा रविवार दिनांक २८ सप्टेंबर २०२५ रोजी सायं ४.०० वाजता, लक्ष्मीनारायण बाग, बाळगोविंददास मार्ग, माहिम, मुंबई ४०००१६ येथे मंडळाच्या सभागृहात आयोजित करण्यात आली आहे, तरी सर्व सभासदांनी सभेस वेळेवर उपस्थित रहावे, ही विनंती.

**वार्षिक सर्वसाधारण सभेपुढील विषय**

१) दिनांक ११ ऑगस्ट २०२४ रोजी संपन्न झालेल्या सर्वसाधारण सभेचे इतिवृत्त वाचून मंजूर करणे.

२) दिनांक ११ ऑगस्ट २०२४ नंतर झालेल्या कार्याचा आढावा.

३) मागील सभेत ठरल्याप्रमाणे संस्थेच्या वास्तूत उव्दाहक बसविणे तसेच दुसऱ्या मजल्यावरील सभागृहाच्या आणि स्वयंपाकगृहाच्या दुरूस्तीसंबंधी कामाचा आढावा.

४) मध्यवर्ती मंडळातर्फे मा. लघुवाद न्यायालयात प्रलंबित असलेल्या भाडेकरू विरोधातील दाव्यासंबंधी सद्यस्थिती विषद करणे.

५) आर्थिक वर्ष २०२४-२०२५ या वर्षाचा अहवाल व सनदी लेखापालांनी तपासलेली हिशेब पत्रके व ताळेबंद मंजूर करणे.

६) सन २०२५-२०२६ या वर्षांसाठी सनदी लेखापालाची नेमणूक करणे व त्यांचे मानधन ठरविणे.

७) सन २०२५-२०२६ या वर्षांचे अंदाजपत्रक मंजूर करणे.

८) अध्यक्षांच्या परवानगीने आयत्यावेळी येणाऱ्या विषयांवर चर्चा

कार्यकारी मंडळाच्या आदेशानुसार

**प्रभाकर पांडुरंग कुलकर्णी**
(कार्याध्यक्ष)

**मिलिंद मल्हारराव सरदेशमुख**
(कार्यवाह)

**तळटीप :** आर्थिक वर्ष २०२४-२०२५ या वर्षाची सनदी लेखापालांनी तपासलेली हिशेब पत्रके व ताळेबंद सभासदांना पाहण्यासाठी संस्थेच्या संकेत स्थळावर प्रसिध्द केले जातील. यावर सभासदांना हिशेबासबंधी विचारणा करावयाची असेल तर कार्यालयीन वेळेत संस्थेस लेखी कळविणे आवश्यक आहे.

**अग्रसूचना :** गणसंख्याच्या अभावी वरील सभा तहकूब झाल्यास ती सभा त्याच दिवशी म्हणजे रविवार दि. २८ सप्टेंबर २०२५ रोजी सायं ४.३० वाजता, लक्ष्मीनारायण बाग, बाळगोविंददास मार्ग, माहिम, मुंबई ४०००१६ येथे मंडळाच्या सभागृहात अग्रसूचनेत नमूद केलेली कामे करण्यात भरले अशा तहकूब झालेल्या सभेस गणसंख्येचे बंधन राहणार नाही.

## कु. यज्ञेश दर्शन जेऊरकर याची वयाच्या १० व्या वर्षी एशिया बुक ऑफ रेकॉर्डमध्ये नोंद



जळगांव येथे इयत्ता ७वीत शिकणारा यज्ञेशचे सुरूवातीचे शिक्षण त्याचे वडील दर्शन जेऊरकर यांच्याकडे झाले. पंजाब घराण्याचे प्रसिद्ध तबला वादक श्री. स्वप्नील भिसे यांच्याकडे सध्या (ऑनलाइन) पद्धतीने तबल्याचे शिक्षण घेत आहे. यज्ञेशचा हा प्रवास थक्क करणारा असून त्याला विविध स्पर्धेमध्ये पारितोषिके मिळालेली आहेत. वयाच्या १०व्या वर्षी (Longest duration Tabla play) यासाठी एशिया बुक ऑफ रेकॉर्डमध्ये त्याची नोंद झाली आहे. श्री. यज्ञेशला मिळालेल्या विविध पारितोषिकाची यादी पुढील प्रमाणे :- नागपूर येथे बालरंगभूमी परिषद (अखिल भारतीय नाट्य परिषदेची घटक संस्था) आयोजित एकल तबला वादन स्पर्धेत प्रथम पारितोषिक - डिसेंबर २०२२, जालंधर येथे बाबा श्री हरिवल्लभ आयोजित तबला वादन स्पर्धेत व्दितीय पारितोषिक - डिसेंबर २०२२, संगित वात्सल्य स्वरांगण अकोला आयोजित एकल तबला वादन स्पर्धेत व्दितीय पारितोषिक - २०२२ , अखिल भारतीय सांस्कृतिक संघ पुणे (ऑफिशियल पार्टनर ऑफ युनेस्को) आयोजित संगीत स्पर्धेत प्रथम पारितोषिक - मे २०२३ तसेच थायलँड येथे होणाऱ्या आंतरराष्ट्रीय स्पर्धेसाठी निवड., मुंबई येथे दादर माटुंगा आयोजित एकल तबला वादन स्पर्धेत प्रथम पारितोषिक - ऑगस्ट २०२३, झंद्धती २०२३ - वर्ल्ड फोरम ऑफ आर्ट अँड कल्चर - बाय आर्ट ऑफ लिव्हिंग आयोजित संगीत स्पर्धेत प्रथम पारितोषिक व वाद्य भूषण पुरस्कार, पंडित कंठे महाराज स्मृती समारोह, छत्रपती संभाजी नगर आयोजित एकल तबला वादन स्पर्धा व्दितीय पारितोषिक - २०२४, गोमांतक मराठा मंडळ आयोजित पं वल्हे मामा एकल तबला वादन स्पर्धेत व्दितीय पारितोषिक - जानेवारी २०२४, स्वामी विवेकानंद फाउंडेशन ऑफ आर्ट अँड कल्चर कलकत्ता आयोजित ताल तंत्र स्पर्धेत प्रथम पारितोषिक - मे २०२४, आंतरराष्ट्रीय संस्द्धती कलाक्षेत्र, चेन्नई आयोजित संगीत स्पर्धेत प्रथम कीर्ती पुरस्कार - जून २०२४, संस्द्धती भारत खरगपूर आयोजित जय जगन्नाथ रथ यात्राा तबला वादन स्पर्धेत प्रथम पारितोषिक - जुलै २०२४, उस्ताद लड्डुमिया खान साहेब प्रतिष्ठान आयोजित एकल तबला स्पर्धेत प्रथम पारितोषिक - सप्टेंबर २०२४, ऋग्वेद संस्था, नाशिक आयोजित एकल तबला वादन स्पर्धा - प्रथम पारितोषिक - डिसेंबर २०२४, पंडित कंठे महाराज स्मृती समारोह, छत्रपती संभाजी नगर आयोजित एकल तबला वादन स्पर्धा प्रथम पारितोषिक - २०२५. श्री. यज्ञेशच्या या प्रगतीसाठी अखिल देशस्थ ऋग्वेदी ब्राह्मण मध्यवर्ती मंडळातर्फे खूप खूप शूभेच्छा.

## कृतज्ञता देणगी

**संस्थेचे ज्येष्ठ सभासद, मार्गदर्शक श्री. आशुतोष रारावीकर यांनी**
**अखिल देशस्थ ऋग्वेदी ब्राह्मण मध्यवर्ती मंडळाच्या शैक्षणिक कार्यास**
**रु. १०,००० ची देणगी दिली आहे.**
**अखिल देशस्थ ऋग्वेदी ब्राह्मण मध्यवर्ती मंडळातर्फे**
**माननीय श्री. आशुतोष रारावीकर यांचे आभार.**


IndusInd Bank
THE ULTIMATE SAVINGS ACCOUNT IS HERE
%
Attractive Interest Rates*
on savings account and fixed deposits
My ACCOUNT My NUMBER
Freedom to choose your account number
GET UP TO 20%* OFF
on food & groceries from Swiggy & BigBasket
BUY ONE GET ONE FREE
movie ticket on BookMyShow*
Complimentary Airport Lounge Access*
Attractive discount on all locker types
Indus Mobile
All-in-one app for banking, shopping, travel, payments and much more
AutoPay
Manage your payments & SIPs using UPI, cards & mobile
*T&C Apply
To know more, please speak to our Customer Service Manager or visit us at www.indusind.com

*With best compliments from*

# SAMARTH
## URBAN CO-OP. CR. SOCIETY LTD.

**HEAD OFFICE:** Samarth Sadan, Gurukrupa Complex, 1st Floor, Maruti Galli, Belgaum. **Ph.: 2431357, 2403968, 4202100**

**RC Nagar Branch:** Bhagirathi, C Scheme, Channama Nagar Main Road, Belgaum. **Ph.: 2443161**
**Tilakwadi Branch:** Samarth Landmark, Opp. Indian Bank, Mangalwar Peth, Tilakwadi, Belgaum. **Ph.: 2430357**
**Shahapur Branch:** 1103, Ground Floor, Bichu Galli, Shahapur, Belgaum. **Ph.: 2431257**
**Khanapur Branch:** 1524/A6, Manerikar Bldg., Belgaum-Goa Road, **Ph.: 6363090655**

**AKSHAY DEPOSIT SCHEME**

| | | | |
|---|---|---|---|
| 46 days to 180 days | 6.00% PA | 2 years | 9.00% PA |
| 181 days to 364 days | 6.50% PA | 3 years | 10.00% PA |
| 1 year | 8.00% PA | | |

Senior Citizen 1% extra*

**NIRANTAR**

| | |
|---|---|
| 1 year | 8% PA |
| 2 years | 9% PA |
| 3 years | 10% PA |

*T&C Apply



**Adv. Ajay A. Sunalkar**
Chairman



**Rtn. Abhay V. Joshi**
Vice - Chairman

**BOARD OF DIRECTORS**

Ganapat A. Kulkarni • Vinayak G. Joshi • Pradeepkumar G. Kulkarni
Arvind S. Kulkarni • Maltesh G. Patil • Sunanda C. Altekar • Chaya N. Joshi
Anil V. Bhandari • Umesh D. Sungar • Parashuram M. Kamble • Ashok H. Pujeri
Raghavendra S. Kesnur - Secretary • Gouri S. Bidi - Gen. Manager

**A LEADING CO-OPERATIVE SOCIETY IN BELGAUM DISTRICT**

anandads

**Samachar Patrika RNI 16775/1967 Regd. No. MCW-126/2024-26,** Published on 15th of every month. Posted at MUMBAI PATRIKA CHANNEL SORTING OFFICE, GPO, Mumbai - 400 001 on, 15th Day of every month.



**मध्यवर्ती मुंबई कार्यालयात स्वातंत्र्यदिनानिमित्त ध्वजारोहण नितीन शहापूरकर आणि रमेश पाटील यांचे हस्ते**

Printed and Published by MILIND MALHARRAO SARDESHMUKH on behalf of AKHIL DESHASTHA RUGVEDI BRAHMAN MADHYAWARTI MANDAL,Printed at GURUKRUPA, 03, ROSSARY BUILDING, M M C ROAD, MAHIM (WEST), MUMBAI 400 016 and Published from AKHIL DESHASTHA RUGVEDI BRAHMAN MADHYAWARTI MANDAL, LAXMI NARAYAN BAUG, BAL GOVINDAS MARG, MAHIM, MUMBAI 400 016. Editor : MILIND MALHARRAO SARDESHMUKH